सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४

# इंधनविरहित सौरऊर्जा संवर्धनाच्या संशोधनास पेटंट

कोल्हापूर, ता. ११ : केमिकल डिपॉझिशनच्या साहाय्याने सोलर सेल थीन फिल्म तयार करण्याच्या उपकरणाचे संशोधन शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. चैताली बगाडे, विवेकानंद महाविद्यालयातील किरण बगाडे, सातारा येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सचे डॉ. संतोष कांबळे यांनी केले. इंधनविरहित, पर्यावरणावर कमी प्रभाव करणाऱ्या या उपक्रमाद्वारे ऊर्जा संवर्धनास मदत मिळणार आहे. त्याबाबतच्या संशोधनाला यु. के. (इंग्लंड) चे पेटंट मिळाले आहे.



प्रा. डॉ. चैताली बगाडे



किरण बगाडे



डॉ. संतोष कांबळे

सहजरीत्या सौरऊर्जेची निर्मितीसाठी केमिकल डेपोसिएशनच्या साहाय्याने थीन फिल्म तयार केले आहे. हे उपकरण नॅनोमिश्रित मटेरियलपासून अत्यल्प किमतीमध्ये सौरऊर्जा तयार करण्याच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्याबाबतच्या संशोधनातील अपॅरेटस फॉर केमिकल डिपॉझिशन ऑन नॅनो स्ट्रक्चर थीन फिल्म सोलर सेल या संशोधनाला पेटंट मिळाले आहे.

या संशोधन कार्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनावणे, अप्लाईड केमिस्ट्री विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. व्ही. अनुभुले, प्रा. डॉ. पी. एन. भोसले, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.